विकास गावाचा, सहभाग सर्वांचा



# शाश्वत विकास ध्येयांच्या नऊ संकल्पना

ग्राम विकास विभाग,
महाराष्ट्र शासन

unicef
for every child

यशदा

**बालस्नेही व लिंगभाव अनुकूल पंचायत कार्यक्रमांतर्गत**

# शाश्वत विकास ध्येयांच्या नऊ संकल्पना


**प्रकाशक**

- **ग्राम विकास व पंचायत राज विभाग**
  ७ वा मजला, बांधकाम भवन,
  मर्झबान रोड, फोर्ट,
  मुंबई, महाराष्ट्र ४०० ००१
  संकेत स्थळ: www.maharashtra.gov.in

- **युनिसेफ, महाराष्ट्र कार्यालय**
  बी विंग, ४ था मजला, २१५ अ‍ॅट्रीयम,
  अंधेरी - कुर्ला रोड, चकाला, अंधेरी (पूर्व)
  मुंबई, महाराष्ट्र, भारत -४०० ०९३
  संकेत स्थळ: www.unicef.org/india/

- **यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी**
  राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे, महाराष्ट्र-४११००७
  दूरध्वनी : ०२०-२५६०८२७१ फॅक्स : २५६०८१००
  संकेत स्थळ: www. yashada.org


सदर पुस्तिका '**बालस्नेही व लिंगभाव अनुकूल पंचायत**' या पथदर्शी कार्यक्रमासाठी प्रशिक्षण साहित्य म्हणून तयार करण्यात आली आहे.

# प्रस्तावना

पंचायत राज मंत्रालय भारत सरकार यांनी ग्रामपंचायत स्तरावर लोकसहभागाद्वारे ही शाश्वत विकास ध्येयं स्थानिक नियोजनाच्या माध्यमातून साध्य करण्याचा संकल्प केलेला आहे.

भारतातील बहुसंख्य लोकसंख्या ही गावामध्ये राहत असल्याने ही शाश्वत विकासाची ध्येये साध्य करण्यासाठी त्यांचे स्थानिकीकरण करणे आवश्यक आहे. स्थानिकीकरण हे स्थानिक आराखड्याच्या नियोजनातून करणे अपेक्षित आहे. ही बाब ध्यानात घेवून पंचायत राज मंत्रालय, भारत सरकाराने संकल्पनात्मक दृष्टीकोणाचा स्वीकारुन नऊ संकल्पनांचा अवलंब केला आहे.

१. **गरीबी मुक्त गाव** (Poverty free Village)
२. **आरोग्यदायी गाव** (Healthy Village)
३. **बालस्नेही गाव** (Child Friendly Village)
४. **जल समृध्द गाव** (Water Sufficient Vilage)
५. **स्वच्छ आणि हरित गाव** (Clean and Green Village)
६. **पायाभूत सुविधायुक्त गाव** (Village with Self Sufficient Infrastructure)

**७. सामाजिक न्याय आणि सामाजिक दृष्ट्या सुरक्षित गाव** (Socially Jist Socially Secured Village)

**८. सुशासन युक्त गाव** (Village with Good Governance)

**९. महिलास्नेही गाव** (Gender Women Friendly Village)

१७ शाश्वत विकास ध्येयं या नऊ संकल्पनांमध्ये सामावलेली असून, या संकल्पनांमध्ये वेगवेगळ्या ध्येयांची संकल्पनांची व्यवहार्य गुंफण करण्यात आलेली आहे. या ध्येयांचे विविध मंत्रालयांबरोबर आलेखन केलेले आहे. मात्र असे असले तरीही या संकल्पनांच्या दृष्टीने त्यांची अंमलबजावणी करताना कुठल्याही एक संकल्पना एका पेक्षा अधिक मंत्रालयांचा आणि विभागांचा सहभाग व सक्रीय भूमिका महत्वाची आहे. म्हणूनच यातील कुठल्याही एका संकल्पनेची आपण जेव्हा प्रत्यक्ष अंमलबजावणी करु, त्यावेळी या विविध मंत्रालये आणि विभागांकडील योजना व कार्यक्रमांच्या अभिसरणाची नितांत आवश्यकता आहे. म्हणूनच या संकल्पनांची अंमलबजावणी करताना या कार्यास मूर्त स्वरुप आणण्यासाठी होल ऑफ गर्व्हमेंट आणि होल ऑफ सोसायटी ॲपरोच (Whole of Goverment and Whole of Society Approach) घेणे आवश्यक आहे.

संकल्पना-१

# गरीबीमुक्त गाव

## दूरदृष्टी

गरीबी मुक्त गाव म्हणजे असं गाव, ज्या गावात सर्व समाज घटकांची भरभराट आणि वाढ होण्यासाठी आवश्यक उपजिविका, विकासाची पुरेशी साधने उपलब्ध असतील, असं गाव ज्या गावामध्ये कुणीही मागे राहू नये, यासाठी सर्व समाज घटकांना सामाजिक सुरक्षितता उपलब्ध असेल.

# ग्रामपंचायतीची भूमिका

- सामाजिक, आर्थिक आणि जाती जनगणना आणि मिशन अंत्योदय संकलित माहितीनुसार अनेक अंगांनी वंचित राहिलेल्या लोकांची निवड करणे.
- मनरेगा अंतर्गत जॉब कार्डचे वितरण व मागेल त्याला काम देणे.
- सार्वजनिक वितरण प्रणालीमध्ये गरजू लोकांच्या नाव नोंदणीसाठी त्यांना मार्गदर्शन व सहकार्य करणे.
- कौशल्यावर आधारित प्रशिक्षणातून उत्पन्न, उद्योगजता विकास आणि रोजगार वाढविणे.
- जमिनीच्या उत्पादकतेत वाढ करणे, त्यासाठी सिंचन, उन्नत सुधारित बीज, जैविक खते, शेतीचे आधुनिक नव तंत्रज्ञान, कृषि विज्ञान केंद्रे (KVKs GPDP) इत्यादींचा वापर करणे.
- स्वयंसहायता गटांना सहाय्यक ठरतील असे प्रशिक्षण देऊन त्यांना बचत वाढीच्या उपक्रमात सहभागी करुन घेत गटांसाठी बँक लिंकेज उपलब्ध करुन देणे.
- GPDP मध्ये निधीचे आणि उपक्रमांचे अभिसरण करण्याचे नियोजन करतांना ग्राम गरीबी निर्मूलन आराखडा (VPRP) यात समन्वय साधणे.

## १०० टक्के अंमलबजावणी करा.

- पात्र लाभार्थ्यांना (वृध्द, दिव्यांग, विधवा, निराधार) यांना पेन्शन योजनांचा लाभ मिळवून द्या.
- बचत गट तसेच शेतकरी गटांना शेती पूरक उद्योगांच्या विविध योजनांशी जोडणी करा.
- सर्व कुटुंबांचे सार्वजनिक धान्य वितरण प्रणालीसाठी नामांकन करा.
- आयुष्मान भारत योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना संरक्षण द्या.
- मनरेगा अंतर्गत जॉब कार्डधारकांना सातत्याने कामाची उपलब्धता करा.
- स्वयंसहय्यता गटांना प्रशिक्षणाद्वारे सक्षम करा.
- शेती विषयक दर्जेदार बियाणे, जैविक खते, माहिती तंत्रज्ञानाचा अवलंब करुन शेती जमिनीच्या उत्पादकतेत वाढ करा.
- मूलभूत सेवा उदा. निवारा, पाणी आणि स्वच्छता इ. यांची पुरेशी उपलब्धता करा.
- ग्रामपंचायत विकास आराखडा निधी आणि इतर कार्यक्रमांचे अभिसरण करण्यासाठी नियोजन करा.

## हे सुनिश्चित करा!

- गरीब कुटुंबे तसेच कौशल्य विकासाच्या हेतूने उत्सुक व्यक्तींची नोंदणी करण्यासाठी वॉर्ड सभा तसेच महिला सभेचे आयोजन करा.
- स्थानिक अकुशल कामगारांची नोंदणी करा.
- सामाजिक सुरक्षा योजनांमध्ये पात्र व्यक्तींची नोंदणी करण्यासाठी शिबिरांचे आयोजन करा.
- जिल्हा कौशल्य केंद्राच्या माध्यमातून कौशल्यांची गरज समजून घेऊन विविध प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करा.
- आपत्ती व्यवस्थापनासाठी टास्क फोर्सची स्थापना तसेच गावात व ग्रामपंचायतीत समाविष्ट होणाऱ्या आपत्ती व्यवस्थापनाच्या विविध उपक्रमांची माहिती करून घ्या.
- शेतकऱ्यांचे उत्पन्न आणि उत्पादकता वाढण्याच्या दृष्टीने कृषी विकास केंद्रांच्या माध्यमातून समन्वय करा.
- बचत गटांच्या उत्पन्नात वाढ व्हावी म्हणून विविध कार्यक्रम व उपक्रमांचे आयोजन करा.
- गरजू व्यक्तींकरिता कौशल्य विकास प्रशिक्षण, उद्योग व्यवसाय उपक्रम व रोजगार निर्मितीद्वारे उत्पन्न वाढ करा.

## सशक्तीकरण करा!

- बचत गट तसेच गाव संघटना सशक्त करा.
- बँक दूताची नियुक्त करा.
- शेतकरी उत्पादक गट तयार करा.
- पशु सखी तसेच किसान मित्रांची नियुक्ती करा.

## याला नाहीच म्हणा / थांबा

- शोषण करणाऱ्या अटींवर दिलेले कर्ज किंवा उधारी थांबवा.
- गावातील मादक पदार्थांचे सेवन व विक्रीवर बंदी घाला.

## या योजनांपर्यंत पोहोचा!

**सामाजिक सुरक्षा कार्यक्रम -** सार्वजनिक धान्य प्रणाली, पोषण आहार, प्रधानमंत्री मातृ वंदना योजना, जननी सुरक्षा योजना, मनरेगा, दिव्यांग पेंशन योजना, जीवन विमा योजना, उपजिविका व उद्यमिता प्रोत्साहन योजना इ. योजना गरजूंपर्यंत पोहोचवा.

## संकल्पना-२

# आरोग्यदायी गाव

### दूरदृष्टी

सर्व वयोगटातील सर्वांचे जीवन निरोगी आणि आरोग्यदायी करणे.

# ग्रामपंचायतीची भूमिका

- मुले व स्त्रिया यांच्यातील कुपोषण कमी करणे.
- किशोरवयीन मुली आणि महिलांमधील ॲनिमिया कमी करणे.
- पाच वर्षांखालील मुलांना पौष्टीक आहार मिळण्याची खात्री देणे.
- संसर्गजन्य रोगांविषयी आरोग्य संवर्धन व प्रतिबंध, लवकर निदान व उपचार उपलब्ध करणे.
- मुलींच्या विवाहाच्या आणि गरोदरपणाच्या वयाबाबत गावात जागरुकता निर्माण करणे.
- किशोरवयीन आरोग्य (पोषण आहार, समुपदेशन, सॅनिटरी नॅपकीनचा वापर आणि त्याची सुरक्षित विल्हेवाट)
- नवजात बालके व पाच वर्षांखालील मुलांचे प्रतिबंध करण्यायोग्य मृत्यू रोखणे.
- क्षयरोग, एच आयव्ही (TB, HIV etc) यासारख्या संसर्गजन्य आजारांचा प्रतिबंध आणि उपचार
- जीवन शैलीच्या बदलामुळे होणारे मधुमेह, कर्करोग यासारख्या आजारांचा प्रतिबंध आणि त्यावर उपचार
- आयुष (AYUSH-आयुर्वेद, योग, नॅचरोपॅथी, युनानी, सिद्धा आणि होमिओपॅथी) चा प्रसार आणि वापर वाढविणे.

## १०० टक्के अंमलबजावणी करा.

- सर्व गर्भवती महिलांचे पहिल्या तीन महिन्यात नोंदी करा.
- गर्भवती महिलांची चार वेळा ए. एन. सी. तपासणी करा.
- संस्थांमध्ये प्रसूतीसाठी प्रोत्साहन द्या.
- मुलांचे पूर्ण लसीकरण करा.
- सर्व गर्भवती महिलांच्या वजनावर देखरेख करा.
- ५ वर्षाहून लहान मुलांच्या वजनावर देखरेख करा.
- आयसीडीएस अंतर्गत सर्व मुले (६ महिने ते ६ वर्षे), गर्भवती महिला आणि स्तनदा माता, यांना पोषक आहार मिळेल याची खात्री करा.

## देखरेख करा!

- मलेरिया तसेच पाण्याने उद्भवणाऱ्या विविध रोगांचे नियमन करण्यासाठी स्वच्छतेची देखरेख करणे.
- कुपोषित बालकांच्या आरोग्यात सुधारणा होण्यासाठी देखरेख करणे.

## हे सुनिश्चित करा!

- ❑ लिंगाधारित गर्भपात होणार नाही यावर देखरेख करा.
- ❑ बाल विवाह होणार नाही यासाठी जागृती करा.
- ❑ कौटुंबिक हिंसा होणार नाही यासाठी उपाय योजना करा.
- ❑ नियमितपणे व्ही.एच.एन.डी.चे आयोजन आणि दर्जेदार सेवा पुरवा.
- ❑ शाळांमध्ये पौष्टिक मध्यान्ह जेवण उपलब्ध करा.
- ❑ संकटकालीन सेवा (जसे रुग्णवाहिका व हेल्पलाईन) इत्यादीची तयारी ठेवा.
- ❑ स्वच्छ आणि सुरक्षित पिण्याचे पाणी आणि कचरा यांचे व्यवस्थापन करा.
- ❑ संसर्गजन्य रोगांना आळा घालण्यासाठी योजना करा.
- ❑ प्राथमिक आरोग्य केंद्र / उपकेंद्र /आरोग्य केंद्रांमध्ये टेलीमेडिसिनची सुविधा उपलब्ध करा.
- ❑ जनावरांकडून केले जाणारे हल्ले किंवा तत्सम अन्य अपघातांच्या वेळी तातडीच्या सेवा उपलब्ध करा.
- ❑ अपंगत्वाचे निदान आणि व्यवस्थापन करा.

## उल्लेखनीय रित्या कमी करा.

- माता मृत्यू, नवजात शिशु आणि बाल मृत्यू दर कमी करा.
- गंभीर रित्या वजन कमी असलेल्या बालकांवर लक्ष द्या
- गावातील फॉर्म्युला दुधाची विक्री करा.

## प्रोत्साहन द्या !

- ❑ नवजात अर्भकाला जन्मत:च एक तासाच्या आत आईचे दूध द्या. तसेच बालक सहा महिन्यांचे होईपर्यंत द्या.
- ❑ सर्व बालकांना सहा महिन्यानंतर स्तनपानासोबत घरातील पौष्टिक आहाराची सुरुवात करा.
- ❑ आहारात पौष्टिक धान्य, भाजीपाला यांचा वापर करा.
- ❑ ताजी फळे आणि भाजीपाला मिळण्यासाठी परसबाग किंवा पौष्टिक बाग (घरी आणि शाळेत)
- ❑ व्ही.एच.एन.डी. किंवा अन्य माध्यमांच्या मार्फत मासिक पाळीच्या संदर्भात जागृती आणि व्यवस्थापन करा.
- ❑ कुटुंबातील सदस्यांनी दररोज शौचालयाचा वापर करा.
- ❑ मानसिक आरोग्य व संदर्भ सेवांविषयी जागरूकता करा.

## संकल्पना-३

# बालस्नेही गाव

### दूरदृष्टी

सर्व बालकांची त्यांच्या पूर्ण क्षमतेपर्यंत वाढ होण्यासाठी त्यांचा जगण्याचा, विकासाचा, संरक्षणाचा व सहभागितेचा हक्क सुनिश्चित करणे.

# ग्रामपंचायतीची भूमिका

- पाच वर्षाखालील सर्व मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षण व पोषण आहार मिळत असल्याची खात्री करणे.
- अंगणवाडी व शाळेत पोषण गार्डन / परसबाग निर्माण करणे.
- मुलांना सर्व प्रकारचे शोषण आणि हिंसाचारापासून सुरक्षितता प्रदान करणे.
- मुलांसाठी आरोग्य शिबिरांचे आयोजन करणे. त्याचे नियमित लसीकरण होत असल्याची खात्री करणे.
- बालसभा आयोजन व बालपंचायत स्थापना करणे
- सर्व मुलांना समावेशक आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळत असल्याची खबरदारी घेणे.
- मुलांना शाळेत शुध्द व सुरक्षित पिण्याचे पाणी आणि हात धुण्यासाठी कक्ष असल्याची खात्री करणे.
- बालमजूरी, लैंगिक शोषण, बालविवाह आदी प्रतिबंध करणे तसेच बालकांचे स्थलांतरावर लक्ष ठेवणे.
- बाल सभांचे आयोजन करणे, विविध विकास कार्यक्रमांमध्ये बालकांचा सहभाग सुनिश्चित करणे.

## १०० टक्के अंमलबजावणी करा.

**मुले ही भविष्यासाठी जगातील सर्वात महत्त्वाचे संसाधन आणि सर्वात मोठी आशा आहे; त्यासाठी,**

- जन्माची नोंदणी आणि जन्म प्रमाणपत्र
- आधार कार्डची नोंदणी
- लसीकरण
- अंगणवाडी/नर्सरी साठी नोंदणी
- प्राथमिक शाळेत नोंदणी
- गर्भवती महिलांची नोंदणी आणि गर्भावस्थेतील तसेच प्रसूती नंतरच्या सर्व तपासण्या करा. तसेच संस्थात्मक प्रसूती
- व्ही.एच. एन. डी. चे आयोजन करा.

## चर्चा करा

- सकरात्मक आणि सहभागी पालन पोषण
- लैंगिक समानता
- बाल अधिकार

## हे सुनिश्चित करा !

- ❑ पिण्याचे पाणी आणि स्वच्छता असलेली अंगणवाडी
- ❑ बाल सभेची स्थापना करा.
- ❑ बाल संरक्षण दलाची स्थापना करा.
- ❑ दर्जेदार पौष्टिक आहाराची उपलब्धता करा.
- ❑ सुरक्षित पिण्याचे पाणी व हात धुण्यासाठी सुयोग्य जागा
- ❑ पोषण बागेची निर्मिती करा.
- ❑ दर्जेदार शिक्षणा सोबतच शालेय गणवेश, पाठ्यपुस्तके, शिष्यवृत्ती अनुदान वेळेत उपलब्ध करुन द्या.
- ❑ मुलांबाबतच्या कायदेशीर तरतुदींविषयी नागरिकांमध्ये आणि पालकांमध्ये जागृती निर्माण करा.

## याला नाकारा आणि पूर्ण नष्ट करा !

- बाल मजुरी बंद करा.
- बाल विवाह रोखा.
- बालकांवरील लैंगिक अत्याचारांचा बंदोबस्त करा.
- बालकांचे शोषण आणि तस्करी वर लक्ष ठेवा.

## सशक्तीकरण करा!

- शाळा व्यवस्थापन समिती सक्षम करा.
- शिक्षक पालक संघांच्या नियमित बैठका घ्या.
- ग्राम बाल संरक्षण समिती सक्रीय करा.
- गाव आरोग्य, स्वच्छता आणि पोषण समिती सक्षम करा.
- अंगणवाडी कार्यकर्ती/ताई, आशा ताई व शाळेतील शिक्षक व मुख्याध्यापक यांच्याशी मुलांबाबत संवाद ठेवा.
- स्थानिक स्वशासनात मुलांचा सहभाग असल्याची खात्री करा.
- मुलांसोबत होणाऱ्या सर्व प्रकारच्या हिंसाचाराचे प्रमाण कमी करण्यासाठी सुरक्षित वातावरण निर्माण करा.

## या योजनांपर्यंत पोहोचा!

**सामाजिक सुरक्षा कार्यक्रम** -जसे,

सार्वजनिक धान्य प्रणाली, प्रधानमंत्री मातृ वंदना योजना, जननी सुरक्षा योजना, मनरेगा, अपंग व विधवा पेन्शन, बांधकाम कामगार कल्याण व अन्य योजना नागरिकांपर्यंत पोहोचवा.

संकल्पना-४

# जलसमृध्द गाव

## दूरदृष्टी

गावातील सर्व घरांसाठी वैयक्तिक नळ जोडणीद्वारे मापदंडानुसार गुणवत्तापूर्ण आणि दर्जेदार पाणीपुरवठा, उत्तम पाणी व्यवस्थापन, शेतीसाठी आणि पाण्याच्या सर्व गरजा पूर्ण होतील इतकी मुबलक पाण्याची उपलब्धता आणि पाण्याचा पुर्नवापर आणि पुनर्भरण याद्वारे जल परीसंस्था जतन करणे.

# ग्रामपंचायतीची भूमिका

- सर्वांसाठी पुरेसे स्वच्छ पाणी आणि पिण्यायोग्य पाणी सुविधांची उपलब्धता.
- गावांमध्ये स्वच्छता सुविधा उपलब्ध करुन देणे.
- घरगुती शौचालयाचा १०० टक्के वापर सुनिश्चित करणे.
- सांडपाणी प्रक्रिया आणि शुध्दीकरणावर यंत्रणा विकसित करणे.
- १०० टक्के हागणदारी मुक्त गाव करणे.
- शाळा आणि अंगणवाडीमध्ये मुला-मुलींसाठी स्वतंत्र आणि पुरेशी, सुस्थितीतील स्वच्छतागृहांची सुविधा देणे.
- भूजलसाठा व पातळी कमी होणे आर्सेनिकमुळे पाणी दुषित होणे यावर तातडीने उपाययोजना करणे.
- सांडपाणी व्यवस्थापनासाठी उपयुक्त तंत्रज्ञानाचा वापर करणे. उदा. मॅजिक पीट, परसबाग सारखे उपाय
- पुरेसा पाणी पुरवठा व पाण्यातील घटकांची तपासणी करुन पाणी गुणवत्ता अबाधित राखणे.
- पावसाचे पाणी संकलन आणि भूजल पुनर्भरण यावर लक्ष देणे.
- आधुनिक शेती व पाणी वापर तंत्रज्ञानाला प्रोत्साहन देणे.

# १०० टक्के अंमलबजावणी करा.

- सर्व कुटुंबांना नळाचे पाणी उपलब्ध करणे.
- सर्व घरांमध्ये शोष खड्डे, परसबाग आणि सांडपाणी व्यवस्थापनाची पर्यायी व्यवस्था उपलब्ध करणे,
- ग्रामपंचायतीतील सर्व संस्थांमध्ये नळाद्वारे पाणी उपलब्ध करुन देणे.
- सर्व सार्वजनिक पिण्याच्या स्त्रोतांचे वर्षातून किमान दोन वेळा गुणवत्ता परीक्षण करणे.
- पावसाच्या पाण्याचे संकलन व पुनर्भरण करणे.
- कोरडवाहू शेतीसाठी जल संवर्धन.
- पाण्याची मागणी व उपलब्धता विचारात घेऊन वॉटर बजेटींग करणे.
- भूजल साठ्यांचे पुनर्भरण व झऱ्यांचे पुनरुज्जीवन करणे. (Rejuvenation of Springs)
- सुयोग्य लघुसिंचन पध्दतीचा वापर (ड्रिप/स्प्रिंक्लर) करणे.
- कार्यक्षम पाणी वापर तंत्रज्ञानावर आधारित शेती करणे.
- गाव स्तरावर पाणी तक्रार निवारण व्यवस्था उपलब्ध करणे.

## हे सुनिश्चित करा!

- सूक्ष्म सिंचन पद्धतीचा वापर करणे. जसे, ठिबक किंवा तुषार सिंचन व्यवस्था करा.
- माझा गाव माझा विकास अंतर्गत पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन करण्यासाठी सामूहिक श्रमांचे योगदान घ्या.
- गळती असलेले/तुटलेले नळ/पिण्याच्या पाण्याचे नळ/पाण्याची टाकी यांची दुरुस्ती आणि देखभाल करणे.
- पाण्याचे स्त्रोत आणि केंद्र यांच्या आसपासच्या ड्रेनेज व्यवस्थेची स्वच्छता करणे.

## योजनांचे सनियंत्रण

- पाण्याच्या केंद्रांचे संरक्षण करण्यासाठी सनियंत्रण समिती व पाण्याचा वापर करण्यांसाठी सामुहिक सनियंत्रण
- पाणी वाहून जाणाऱ्या जागांचे सनियंत्रण
- पाण्याचे वितरण नेटवर्क आणि संचालन
- भूजल स्त्रोतांच्या पुनर्भरणाची (Recharge) योजना

# प्रोत्साहन द्या !

- घरी व शेतामध्ये पावसाच्या पाण्याचे व्यवस्थापन करा.
- व्यक्ती आणि संस्थांद्वारे पाण्याचा विचारपूर्वक वापर करा.
- भूजलाचे पुनर्भरण (Ground water Recharge) करा.
- शेतीसाठी पाण्याचे कुशल तंत्रज्ञान (ठिबक सिंचन तसेच मातीच्या गुणधर्माचे संरक्षण)
- पाण्याचे मिश्र उपयोग -विविध हेतूसाठी करा.
- पाण्याच्या विविध स्त्रोतांचा वापर सिंचनासाठी करा.
- पाण्याचा कमीत कमी वापर करण्यास प्रोत्साहन द्या.
- गावात सार्वजनिक ठिकाणी वृक्ष लागवडीस प्रोत्साहन द्या.
- पाण्याचा वापर करणाऱ्याकडून पाण्याच्या बिलाची नियमित वसुली करणे.
- गाव हागणदारी मुक्त गाव करा.
- नैसर्गिक स्त्रोतांचे जतन व संवर्धन करुन परिसंस्थेचे रक्षण करण्यास प्रोत्साहन द्या.
- भूजलसाठा वाढीसाठी पाऊस पाणी संकलन, भूजल पुनर्भरणास प्रोत्साहन द्या.

संकल्पना-५

# स्वच्छ व हरित गाव

## दूरदृष्टी

आपल्या बालकांच्या भविष्यासाठी निसर्गदत्त हिरवेगार, अपारंपारिक उर्जायुक्त, स्वच्छ, पर्यावरण संरक्षक व हवामान पूरक अशा गावाची निर्मिती करणे.

# ग्रामपंचायतीची भूमिका

- अपारंपारिक उर्जास्त्रोतांचा १०० टक्के वापर
- १०० टक्के हागणदारीमुक्त गाव, वृक्षारोपण व रोपवाटीकेद्वारे हिरवळीची हमी.
- जळावू लाकडांच्या वापरात कपात
- वीज, घरगुती उपकरणं, स्वयंपाक व सिंचनासाठी सर्वांना खात्रीशीर वीज उपलब्धता.
- जैवविविधताचे संवर्धन व देखभाल सुनिश्चित करणे.
- सौर उर्जेच्या वापरास प्रोत्साहन देणे.
- विजेचे कार्यक्षम वितरण करणे.
- उंच उताराचा भाग, नापिक जमीन व इतर जमिनी तसेच रस्त्याच्या दुतर्फा नैसर्गिक वनस्पतींची लागवड करणे.
- जंगले, पाणवठे, वनराई-उपवने आदी नैसर्गिक संसाधनांचे समुदाय आधारीत व्यवस्थापन करणे.
- नैसर्गिक संवर्धनासाठी तयार केलेल्या ग्राम समिती, कार्य समितीस सक्षम करणे.
- एकेरी (सिंगल युज) प्लास्टीक वापरास पूर्णपणे बंदी घालणे.

## १०० टक्के अंमलबजावणी करा.

- सर्व कुटुंबांनी शौचालयांचा दररोज वापर करणे.
- सर्व सार्वजनिक संस्थांमध्ये ( अंगणवाडी केंद्र, पंचायत भवन, उपकेंद्र, शाळा, इ.) शौचालयाची सुविधा करणे.
- सर्व कुटुंबात प्रदूषण किंवा धूर रहित इंधनाचा वापर करणे.
- वृक्ष लागवड कार्यक्रमात लावण्यात आलेल्या वृक्षांची काळजी घेणे.
- गावाच्या आसपास प्लास्टिकच्या वापरावर बंदी घालणे.
- घरे, सार्वजनिक ठिकाणे आणि संस्थांमध्ये कचरा कुंडीचा वापर करणे.

## सशक्तीकरण करा !

- पिण्याचे पाणी आणि स्वच्छता समिती
- गाव आरोग्य, स्वच्छता आणि पोषण समिती
- पाणी वापर समिती
- शाळा व्यवस्थापन समिती

## हे सुनिश्चित करा!

- बेकायदेशीर वृक्षतोड व जंगलातील वृक्षतोडीवर पूर्ण बंदी घाला.
- फर्म आणि कारखान्याच्या मधून होणाऱ्या दुषित पाण्याच्या प्रवाहावर बंदी करुन; पर्यायी व्यवस्था करा.
- उंचावरील भूभाग, ओसाड आणि अन्य भूभाग तसेच रस्त्याच्या कडेला नैसर्गिक वृक्षांची लागवड आणि त्यांचे संवर्धन करा.
- जैव विविधता रजिस्टरमध्ये सर्व जैव विविधतांच्या बारकाईने नोंदी करा.
- प्रदूषण रोधी आणि स्वच्छता सेवांची व्यवस्था करा.
- घन कचरा व्यवस्थापन व्यवस्थापन करा.

## या योजनांपर्यंत पोहोचा!

- स्वच्छ भारत मिशन
- मनरेगा अंतर्गत वृक्षारोपण
- प्रधानमंत्री कुसुम योजना

## प्रोत्साहन द्या!

- अधिकाधिक वृक्षारोपण आणि सार्वजनिक वनीकरणाच्या माध्यमातून हरित आवरणात वाढीस प्रोत्साहन द्या.
- पारंपारिक उर्जेपासून अपारंपारिक उर्जेचा वापर करा.
- गावात बायोगॅस प्रणालीचे बांधकाम व त्याचा वापरासाठी जागृती करा.
- स्थानिक पाण्यावर आधारित उर्जा संसाधनांची स्थापना
- सार्वजनिक तलावामध्ये मत्स्य पालनास प्रोत्साहन द्या.
- सक्षम घनकचरा व्यवस्थापनास प्रोत्साहन द्या.
- सर्व घरे आणि संस्थांमध्ये कचऱ्याचे बृहद आणि सूक्ष्म व्यवस्थापन करा.
- सुक्ष्म सिंचनासाठी उर्जा कार्यक्षम सोलर पंपांचा वापर करा.
- गावात वृक्षारोपन कार्यक्रम आणि रोपवाटिका, खत निर्मिती प्रकल्पांना प्रोत्साहन द्या.
- गावातील उपवने, देवराई, वनराई, जल साठे, वने यासारख्या नैसर्गिक संसाधनांचे समुदायाधारित व्यवस्थापनास प्रोत्साहन द्या.

संकल्पना - ६

# पायाभूत सुविधायुक्त गाव

## दूरदृष्टी

स्वयंपूर्ण पायाभूत सुविधा साध्य करणे आणि सर्वांना पुरेशी, सुरक्षित आणि परवडणारी घरे आणि मूलभूत सुविधा मिळत असल्याची खात्री करणे.

# ग्रामपंचायतीची भूमिका

- अंगणवाडी, शाळा, आरोग्य केंद्र, नागरी सुविधा केंद्रासाठी दर्जेदार पायाभूत सुविधा उपलब्ध करणे.
- ग्रामपंचायत भवन, अंगणवाडी, आरोग्य केंद्र, शाळांमध्ये मुलां-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छता गृह (पाण्याच्या उपलब्धतेसह) यासारख्या दर्जेदार पायाभूत सुविधांची उभारणी करणे.
- बारमाही वापरायोग्य रस्ते, सौर पथ दिवे, सामुदायिक सोलर ट्री, गावातील सर्वांना पक्की घरे उपलब्ध करणे.
- सर्व घरांना वैयक्तिक नळजोडणीद्वारे पाणी पुरवठा करणे.
- बंदिस्त गटर प्रणालीचा वापर करणे.
- गावात निर्माण होणाऱ्या ओल्या-सुक्या कचऱ्याचे वर्गीकरण व व्यवस्थापन करणे.
- शाळेत, अंगणवाड्यामध्ये आणि सार्वजनिक ठिकाणी शौचालय असून ती वापरात असण्याची खात्री करणे.
- सहभागी सर्वेक्षणाद्वारे पायाभूत सुविधांच्या गरजांचे मूल्यमापन
- गाव पायाभूत सुविधानी स्वयंपूर्ण करण्यासाठी गावाला आवश्यक असलेल्या नेमक्या सुविधांची निवड करणे.

# १०० टक्के अंमलबजावणी करा.

- ग्रामपंचायतीच्या हद्दीतील सर्व वॉर्ड आणि वस्त्यांमध्ये गुणवत्तापूर्ण पक्के रस्ते तसेच सार्वजनिक ठिकाणी सौर उर्जेच्या दिव्यांचा वापर करणे.
- अंगणवाडी व शाळांमध्ये (मुलां-मुलींसाठी स्वतंत्र) पुरेशी व पाण्याच्या उपलब्धतेसह स्वच्छतागृहे बांधणे.
- बंदिस्त नाली बांधकामाद्वारे सांडपाणी व्यवस्थापनासाठी सक्षम व्यवस्था करणे.
- शुध्द व पुरेसे पिण्याचे पाणी सर्व कुटुंबाना नळाद्वारे उपलब्ध करणे.
- तांत्रिक सोयी सुविधांनी युक्त योजना माहिती केंद्राची उभारणी करणे.
- प्राथमिक आरोग्य सेवा केंद्र / समुदाय आरोग्य केंद्र व शाळांमध्ये दिव्यांगाची गरज लक्षात घेऊन चांगल्या पायाभूत सुविधा उपलब्ध करणे.
- गावात सार्वजनिक ग्रंथालय, व्यायाम शाळा, ओपन जिम, क्रिडांगण उपलब्ध करणे.

## हे सुनिश्चित करा!

- ग्राम पंचायत भवन, अंगणवाडी, शाळा, उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, यांच्या निर्माण तसेच सनियंत्रण ज्यात शौचालये, तसेच पिण्याच्या पाण्यासाठी वेगवेगळी व स्वतंत्र व्यवस्था उपलब्ध करणे.
- बंद आणि झाकण असलेल्या गटारांची निर्मिती आणि सुयोग्य मल नि:स्सारण व्यवस्था करणे.
- शिफारस केलेल्या वैद्यकीय सुविधांसह (जसे, स्वच्छ बेड, चादरी, इ.) उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्रांची उभारणीला प्राधान्य द्या.
- बस थांबा आणि प्रवाशांसाठी निवारा शेडसह बस थांब्याची सुविधा उपलब्ध करा.
- प्रमुख गावांशी जोडणारे रस्ते व गावातील अंतर्गत रस्त्यांची सुविधा उपलब्ध करा.
- ग्रामपंचायतीत संगणक आणि इंटरनेटची सुविधा उपलब्ध करा.

## प्रोत्साहन द्या !

- बालिका आणि बालकांसाठी खेळाच्या मैदानाची समान व्यवस्था करा.
- सर्व महिला/पुरुष आणि अन्य सर्वांसाठी समान रितीने वाचनालय, व्यायाम शाळा, क्रिडांगणाची सुविधा करा.
- गावातील सर्व नागरिकांसाठी सामुदायिक भवनाची सुविधा करा.
- मुले आणि युवकांसाठी शाळा /कॉलेजमध्ये जाण्या येण्यासाठी परिवहनाची सुविधा उपलब्ध करा.

## या योजनांपर्यंत पोहोचा !

- जल जीवन मिशन
- राज्य वित्त आयोगाचा निधी
- केंद्रीय वित्त आयोग (५० टक्के)
- ग्राम उर्जा स्वराज्य

संकल्पना - ७

# सामाजिक न्याय व सामाजिक दृष्ट्या सुरक्षित गाव

## दूरदृष्टी

गावातील प्रत्येक व्यक्तीची काळजी घेतली जाते ही भावना गावकऱ्यांमध्ये निर्माण करणे आणि प्रत्येक पात्र व्यक्तींना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यासाठी सामाजिक संरक्षण योजनांचा लाभ मिळेल याची खात्री करणे. ग्रामपंचायतमधील असमानता व सर्व प्रकारचे भेदभाव कमी करणे.

# ग्रामपंचायतीची भूमिका

- गावातील सर्व गरीब व वंचित समुहांना सार्वजनिक वितरण प्रणालीमध्ये नाव नोंदणीकरिता मार्गदर्शन करणे.
- गरिब, निराधार आणि दुर्बल घटक ठरविण्यासाठी निकष विकसित करणे.
- गरीब, निराधार आणि दुर्बल घटकांच्या विकासासाठी विविध योजनांच्या माहितीचा प्रचार करणे.
- प्रतिसादात्मक, सर्वसमावेशक आनि सहभागी प्रतिनिधीत्व सुनिश्चित करण्यासाठी ग्रामसभा सक्षम करणे.
- नागरिकांना सर्व सेवा वेळेवर मिळत असल्याची खात्री करणे, तसेच सेवासंबंधी संनियंत्रण करणे.
- दुव्यांग व्यक्तीसाठी पुनर्वसनाची योजना तयार करणे.
- महिला व मुलींसाठी सुरक्षित वातावरण तयार करणे.
- पिडीतांच्या पुनर्वसनाला पाठिंबा देणे आणि दोषींवर कायदेशीर कारवाई करणे.
- सर्वसमावेशक आणि दर्जेदार शिक्षणविषयी खात्री करणे.
- शाळा आणि आरोग्य केंद्रांमध्ये पायाभूत सुविधा देणे.

# १०० टक्के अंमलबजावणी करा.

- अंगणवाडीमध्ये सर्व बालकांची नोंदणी करा.
- सर्व गर्भवती आणि स्तनदा मातांना अंगणवाडी तर्फे पोषक आहार मिळेल याची खात्री करा.
- सर्व वस्त्यांमध्ये सुरक्षित पिण्याच्या पाण्याची आणि स्वच्छतेची सुविधा उपलब्ध करा.
- सर्व पात्र कुटुंबाना रेशन कार्ड उपलब्ध आहे आणि त्यांना नियमित व चांगल्या दर्जाचे रेशन धान्य मिळते याची खात्री करा.
- सर्व पात्र लोकांना आयुष्मान भारत कार्डची सेवा उपलब्ध आहे याची खात्री करा.
- ग्रामपंचायत स्तरावरील वंचितांचा राखीव निधी व दिव्यांग निधीचा योग्य वापर होतो आहे याची खात्री करा.
- सर्व पात्र नागरिकांना सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ मिळवून द्या.

# हे सुनिश्चित करा!

- ❑ प्रवासी कामगारांसाठी सामाजिक सुरक्षा तसेच विशेष करून रेशन कार्ड सारख्या योजनांची सोय करा.
- ❑ अति गरीब कुटुंबांच्या सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी त्यांची योजनांच्या लाभासाठी निवड करा.
- ❑ ग्रामसभेत सर्व वंचित घटकांचा निर्णय प्रक्रियेत सहभाग होईल हे सुनिश्चित करा.
- ❑ दिव्यांगांसाठी मुलभूत सोयी तसेच आवश्यक सोयी सुविधांचा (दिव्यांग स्नेही) उपलब्ध करा.
- ❑ ग्रामपंचायत विकास योजनेत ग्रामपंचायतीसाठी आपत्ती व्यवस्थापनचा समावेश करा.
- ❑ सर्व ग्रामपंचायत स्तरावर मुलभूत संरचनासाठी संचालन आणि देखरेख करा.
- ❑ मनरेगा (MGNREGSA) अंतर्गत रोजगार निर्मिती करुन गरिबी निर्मूलनासाठी प्रयत्न करा.
- ❑ ग्रामपंचायतीला सहाय्यक ठरतील अशा विविध सामाजिक संस्थांचे कार्यक्रम आणि योजनांचे अभिसरण करा.

## आयोजन करा!

- गरीब कुटुंबांना लाभाच्या योजना निवडीसाठी विशेष वॉर्ड सभांचे आयोजन करा.
- सामाजिक सुरक्षा योजना व अर्थ सहाय्य योजनांबाबत नागरिकांमध्ये जागृती कार्यक्रमाचे आयोजन करा.
- योजनांचा लाभ घेण्यासाठी पात्र कुटुंबाना योग्य त्या कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी सहाय्य करा.
- ग्रामसभेमध्ये सामाजिक सुरक्षा योजना, वैद्यकीय सोयी आणि विमा संरक्षण योजना याविषयी चर्चा घडवून आणा.

## समित्या सक्रीय करा!

१. आपत्ती व्यवस्थापन टास्क फोर्स
२. ग्राम आरोग्य, पोषण, पाणी पुरवठा व स्वच्छता समिती
३. रोजगार हमी योजना देखरेख व दक्षता समिती
४. ग्राम बाल संरक्षण समिती
५. रेशन दक्षता समिती
६. शाळा व्यवस्थापन समिती

## संकल्पना - ८

# सुशासन युक्त गाव

### दूरदृष्टी

विविध योजनांच्या अंतर्गत विकासाचे फायदे सुनिश्चित करणे आणि ग्रामपंचायतीमधील सर्व रहिवाशांना सुशासनाच्या माध्यमातून सेवा वितरणाची हमी देणे,

# ग्रामपंचायतीची भूमिका

- ग्राम सचिवालय, शासकीय उपक्रमांचे केंद्र उभारणे.
- प्रशासकीय काम, सेवा वितरण, सामुहिक सुविधा सेवा केंद्र, इतर शासकीय विभागांचा समन्वय करणे.
- स्थानिक कुशल/अर्ध कुशल युवकांच्या सेवा घेणे.
- माहितीचे आदान प्रदान करण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाच्या वापराद्वारे प्रभावीपणे सेवा प्रदान करणे.
- ग्राम समित्यांचे बळकटीकरण करणे.
- क्षमता बांधणी प्रशिक्षणाचे आयोजन करणे.
- विविध योजना व समित्यांसोबत स्थायी समित्यांचे अभिसरण करणे.
- प्रभावी तक्रार निवारण यंत्रणा विकसित करणे.
- लोकसहभागीय ग्रामपंचायत विकास आराखडा करणे.
- आराखड्यात सामाजिक, आर्थिक, पर्यावरणीय घटकांचा समावेश करणे.
- गावाबाहेरील संसाधने (कंपन्यांचा सीएसआर व विविध संस्था, स्वयंसेवी संस्था) मिळवणे.

# १०० टक्के अंमलबजावणी करा.

- ग्रामपंचायतीच्या मासिक बैठका सर्व सदस्यांच्या सक्रीय भागिदारीने नियमित घ्या.
- ग्रामपंचायतीच्या सर्व ग्राम विकास समित्यांच्या नियमित मासिक बैठका घ्या. तसेच समित्यांचे नाम फलक लावा.
- वित्तीय उपक्रम व योजनांची सद्यस्थितीची पारदर्शी माहिती देणारा फलक ग्रामपंचायतीच्या दर्शनी भागात लावा.
- सर्व तऱ्हेच्या जमीन संबंधी दस्तावेजांचे संगणकीकरण आणि आधुनिकीकरण करा.
- नागरिकांची सनद याची प्रभावी अंमलबजावणी करुन लोकांना वेळेवर सेवा पुरविणे.
- ग्रामसभांच्या नियमित बैठका (वर्षातून किमान ४ वेळा)
- ग्रामसभेच्या आधी वॉर्ड सभा, महिला सभा, बालसभा व वंचित समुहांची सभा यांचे आयोजन करा.
- ग्रामसभेत शासनाच्या सर्व शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांना बोलवून त्यांच्या विभागाची माहिती घ्या.
- ग्रामसभेत सर्व योजनांच्या लाभार्थ्यांची निवड करा.

## हे सुनिश्चित करा!

- ❑ महिला व सामाजिक रित्या वंचित समूहांसह सर्वांच्या सहभागाने ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करा.
- ❑ ग्रामपंचायत स्तरावरील बैठकांमध्ये सामान्य महिला आणि महिला नेत्यांचा सहभाग सुनिश्चित करणे
- ❑ ग्रामपंचायतीच्या मासिक सभा, वॉर्डसभा, महिला सभा, बालसभा व वंचितांच्या सभांचे इतिवृत्त तयार करा.
- ❑ ग्रामपंचायत स्तरावरील सर्व ग्राम विकास समित्यांच्या नियमित बैठका घेऊन त्याचे इतिवृत्त तयार करा.
- ❑ ग्रामपंचायत कार्यालयात तक्रार निवारण कक्षाची स्थापना
- ❑ वंचित समूह, महिला बचत गट, युवक यांच्या सामाजिक व आर्थिक विकासासाठी केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजना बाबत माहिती देऊन जागरूकता निर्माण करा.
- ❑ नागरिकांच्या कामांची पूर्तता वेळेवर होण्यासाठी कार्यालयाची कामाची वेळा निश्चित करा.
- ❑ गावात सेवा प्रदान करणाऱ्या कर्मचारी व अधिकाऱ्यांचे मोबाईल नंबर सर्वांना दिसेल अशा बेताने लावा.

## संकल्पना - ९

# महिलास्नेही गाव

### दूरदृष्टी

लिंग समभाव निर्माण करण्यासाठी, महिला व मुलींना समान संधी व सुरक्षित वातावरण उपलब्ध करुन देणे.

# ग्रामपंचायतीची भूमिका

- सर्व सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रात महिलांच्या सुरक्षिततेची हमी घेणे.
- सामाजिक, राजकीय, आर्थिक उपक्रमांमध्ये महिलांचा सहभाग आणि समुदाय आधारित संस्थांमध्ये सहभाग वाढवणे.
- ग्रामसभेत व महिलासभेत महिलांच्या सहभागास प्रोत्साहन देणे.
- गावात महिलांसाठी सुरक्षित वातावरणाची खात्री करणे.
- महिला आणि मुलींमध्ये उत्तम आरोग्याबाबत जागरुकता निर्माण करणे व चांगल्या आरोग्य सुविधा प्रदान करणे.
- सर्व विकास कार्यक्रमात महिलांना समान संधी देणे.
- सर्व मुलींना मोफत, समतुल्य आणि दर्जेदार प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण पूर्ण करतील याची खात्री करणे.
- स्वयं सहाय्यता गटात गरीब महिलांची नाव नोंदणी करुन, आर्थिक विकासाच्या उपक्रमांसाठी संधी निर्माण करणे.
- सर्व महिलांना परवडणाऱ्या आणि दर्जेदार तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षणासाठी समान संधी उपलब्ध करणे.
- महिला विकासासाठी अर्थसंकल्पात पुरेसा निधी ठेवणे.
- समान कामासाठी समान वेतन सुनिश्चित करणे.

## १०० टक्के अंमलबजावणी करा.

- मुलींच्या जन्माची १०० टक्के जन्म नोंदणी करा.
- विवाहांचे १०० टक्के नोंदणीकरण करा.
- गावातील १०० टक्के मुलींना माध्यमिक शिक्षण पूर्ण करण्यास प्रोत्साहित करा.
- गावातील १०० टक्के मुली व महिलांना डिजिटल आणि आर्थिक साक्षर करा.
- काम करू इच्छिणाऱ्या सर्व महिलांना जॉब कार्ड आणि रोजगाराची निश्चितीची हमी द्या.
- शेती, उद्योग, आणि सेवा क्षेत्रात काम करणाऱ्या सर्व महिलांना समान कामाला समान वेतन मिळेल याची खात्री करा.
- सर्व ग्राम विकास समित्यांमध्ये ५० टक्के महिलांचा सहभाग आहे याची खात्री करा.
- महिलांसाठी असलेल्या राखीव बजेटचा महिलांच्या नजरेतून वापर करा.
- महिला सभेत आलेल्या मुद्यांना ग्रामसभेत मान्यता घ्या.

# हे सुनिश्चित करा!

- ❑ शाळेतील मुलांसाठी सायबर गुन्हे आणि मादक द्रव्यांच्या दुष्परिणामा संदर्भात जागृती कार्यक्रमाचे आयोजन करा.
- ❑ शाळा/कॉलेज मध्ये जाणाऱ्या मुलींसाठी सुरक्षित दळणवळणाची सोय उपलब्ध करा.
- ❑ माझा गाव माझा विकास कार्यक्रमांतर्गत महिला बचत गटांना जीवनाधरासाठी संधीची उपलब्धता करुन द्या.
- ❑ मानवी तस्करी आणि बाल विवाहाला आळा घालण्यासाठी १८ वर्षाखालील मुलींची नोंदणी करा.
- ❑ महिलांचा विकासातील सहभाग सुनिश्चित करण्यासाठी कामाच्या जागी मुलांसाठी पाळणाघरांची सोय आणि कामाच्या ठिकाणी लैंगिक अत्याचारा विरोधातील समित्यांचे गठन करा.
- ❑ ग्रामपंचायती मधील सर्व कायदेशीर समित्या आणि महिला सभा यातील महिलांचा प्रभावी सहभाग घ्या.
- ❑ ग्रामपंचायतीच्या विविध बैठकांमध्ये महिला प्रतिनिधीच्या कामात हस्तक्षेप करणाऱ्या घरातील पुरुषांवर बंदी घाला.

## प्रोत्साहन द्या !

- महिलांना सुरक्षा देणाऱ्या विविध कायद्याविषयी मुली, मुले, तरुण व महिलांसोबत चर्चा करा.
- ग्रामसभेत बाल विवाह, लिंग निवड, मुली व मुलांच्या शारीरिक, मानसिक आणि प्रजनन याविषयी चर्चा घडवा.
- मुली व महिलांकरिता पारंपारिक कौशल्यांच्या व्यतिरिक्त आर्थिक स्वावलंबनासाठी विविध आधुनिक कौशल्यांच्या प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करा.
- ग्रामसभेत महिलांच्या सामाजिक व सांस्कृतिक प्रश्नांवर तज्ञ मार्गदर्शकांच्या मदतीने चर्चा घडवून आणा.
- मुली व महिलांसाठी गावात आरोग्य शिबिरांचे नियमित आयोजन करा.
- मुलीचा जन्म साजरा करा. तसेच दोन अपत्यानंतर कुटुंब नियोजन करणाऱ्या कुटुंबांचा सत्कार करा.
- कुटुंबातील मुलांच्या पालन व पोषणात पुरुषांचा सहभाग तसेच घरकामात पुरुषांचा सहभाग सुनिश्चित करण्यासाठी ग्रामसभेत सकारात्मक चर्चा घडवून आणणा.

# सातत्य पूर्ण विकासाला स्थानिक स्तरावर रुजवणे

**स्थानिक पातळीवर म्हणजे ग्राम पंचायती मध्ये सातत्य पूर्ण विकासाच्या १७ लक्ष्याना गाठण्यासाठी त्यांना ९ वेगवेगळ्या विषयांमध्ये समायोजित करण्यात आले आहे.**

# सातत्यपूर्ण विकास लक्ष्य

**जगातील १९३ देशांनी एकत्र येऊन १७ महत्त्वाच्या उद्दिष्टांना पाप्त करून जगाला वर्ष २०३० पर्यंत शाश्वत आणि विकसित करण्याचे वचन दिले आहे**

मी.........................................................
ग्राम पंचायत ...............ची/चा सरपंच म्हणून हे वचन देते/देतो कि, मी ग्रामपंचायतीच्या क्षेत्रातील सर्वांगीण विकास व लोकांच्या हितासाठी सुशासन प्रस्थापित करीन.

मी, विकासामध्ये सर्वांचा सक्रीय सहभाग सुनिश्चित करण्यासाठी पंचायती मधील वॉर्ड सदस्य, समूह अन्य पदाधिकारी यांच्या सोबत समन्वय आणि संपर्क प्रस्थापित करून; गावातील लिंग, वर्ग, जाती, धर्म, दिव्यांग यासारखा कोणताही भेदभाव न करता, सर्व तऱ्हेच्या सेवा, सुविधा, योजना यांचा लाभ पात्र असलेल्या सर्वांना होईल, याची हमी घेते/घेतो.

विशेष करून, मी माझ्या ग्रामपंचायतीला बाल विवाह आणि बाल मजुरी मुक्त करण्याचे वचन देते/देतो, ज्याचा

परिणाम म्हणून प्राथमिक तसेच माध्यमिक शाळातील मुली व मुले यांची उपस्थिती १०० टक्के राहून ती नियमित होईल.

मी गावातील कुटुंबे कौटुंबिक हिंसामुक्त होण्यासाठी पुरुष आणि महिलांसोबत जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करीन तसेच गावातील कायदा आणि सुव्यवस्था मजबूत आणि उत्तरदायी होण्यासाठी प्रयत्न करीन. त्याच बरोबर गावातील वैधानिक समित्यांच्या बैठका उक्त विषयांसाठी नियमित होत राहतील, याची हमी घेईन.

मी ग्रामपंचायतीसाठी सुयोग्य इमारतीची निर्मिती, त्याची दुरुस्ती आणि आधुनिकीकरणासाठी वचनबद्ध राहीन. तसेच ग्रामपंचायतीच्या मूलभूत रचनेला मजबूत आणि शाश्वत करण्यासाठी नियमित ग्रामसभा आणि विकेंद्रित निर्णय प्रक्रियेचा सन्मान ठेवण्याचे वचन देते/देतो.

सुशासन, लैंगिक समानता, आणि बाल विकास व हितासाठी, स्वच्छ, आणि हरित, आरोग्यदायी ग्रामपंचायती-साठी शाश्वत विकासाच्या लक्ष्यांना गाठण्यासाठी पूर्णपणे वचनबद्ध आहे.

तसेच ही महत्त्वाची उद्दिष्टे गाठण्यासाठी माझ्या क्षमतांचा विकास होण्यासाठी सुद्धा मी सातत्याने प्रयत्नशील राहीन, अशी शपथ मी आज घेते/घेतो.

# कोणी मागे राहू नये

महिलांच्या हितांचे गाव

गरीबी मुक्त गाव

स्वच्छ तसेच हिरवे गाव

पुरेसे पाणी असलेले गाव

बालकांच्या हितांचे गाव

आरोग्यदायी गाव




**भविष्यातील येणाऱ्या पिढीसाठी नैसर्गिक संसाधने आणि पर्यावरणाचे रक्षण करणे**

**गरिबी आणि भूक यांना नष्ट करत सन्मान आणि समानता यांना सुनिश्चित करणे**

**स्थानिक समूहासोबत ताळमेळ घालत सर्वांचा विकास सुनिश्चित करणे**

स्थानिक स्वशासन मजबूत असलेले गाव

स्वावलंबी मुलभूत रचना असलेले गाव

सामाजिक रितीने न्याय्य असलेले आणि सुरक्षित गाव